# नाशिक महानगरपालिका, नाशिक

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक – ४२२ ००२

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ च्या कलम ७७,७८,७९,२०९ व २१० अन्वये)

## जाहीर सुचना

क्रमांक ७८ | दि. १९/०६/२०२४

नाशिक महानगरपालिका हद्दीसाठी मा. शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१८१८/सीआर-२३६/१८/ डीपी आणि आरपी/कलम (१अअ) सी आणि कलम – २०(४)/नवि-१३, दि. ०२ डिसेंबर, २०२० अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजूर केलेली असून ती दि. ०३/१२/२०२० पासून अंमलात आलेली आहे. तसेच सदर मंजुर विकास योजनेत मौजे म्हसरुळ शिवारातील स. नं. १६३/२,१९१,१९६,१९७,१८९, १९२,१९४ मधील क्षेत्रातून सन २०१७ सालच्या सुधारित मंजुर विकास योजनेनुसार १५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

मौजे म्हसरुळ येथील स. नं. १६३/२,१९१,१९६,१९७,१८९, १९२,१९४ या जागेतून १५.०० मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित असून रहिवाशी क्षेत्रात समाविष्ट आहे. अर्जदारांनी त्यांचे मालकीचे मौजे म्हसरुळ येथील स. नं. १६३/२,१९१,१९६,१९७,१८९, १९२,१९४ ह्या हिश्यातील संरेषा जागेवरील उपलब्ध असलेल्या परिस्थितीनुसार बदलण्यास विनंती केली आहे. मात्र जागेवर प्रत्यक्ष मोजणी केलेला स्थळदर्शक नकाशाप्रमाणे रस्त्याची संरेषा करणे उचित राहील. वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही असे मत आहे.

नाशिक शहराच्या मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम क्र. ३.११ मधील तरतूदीनुसार स. नं. १६३/२,१९१,१९६,१९७,१८९, १९२,१९४ मध्ये मंजुर नकाशातील विकास योजनेनुसार १५.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याची संरेषेमध्ये अंशत: बदल करणे आवश्यक आहे. आयुक्त, महानगरपालिका यांना रस्त्याची संरेषा बदलण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

उक्त प्राप्त अधिकारात मौजे म्हसरुळ येथील स. नं. १६३/२,१९१,१९६,१९७,१८९, १९२,१९४ या जमिनीवरुन जाणाऱ्या प्रस्तावित १५.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या संरेषा बदलणेकामी अधिसुचना प्रसिध्द होणे गरजेचे असून त्यासाठी तीस दिवसांच्या कालावधीत नागरिकांमार्फत सुचना व हरकती घेणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

ज्या नागरिकांना सदरहु नियोजित फेरबदलांबाबत हरकती/सुचना द्यावयाच्या असतील त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक, राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात सादर कराव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या सुचना/हरकती यांचा विचार केला जाणार नाही.

डॉ. अशोक करंजकर(भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

सदरची सुचना नाशिक महानगरपालिकेच्या www/nmc[redacted].gov.in या वेबसाईटवर देखील उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

Scanned with OKEN Scanner